श्री. शिरिष ग. जोशी(अध्यक्ष) || श्री व्याघ्रेश्वर प्रसन्न || श्री आनंद सु. रानडे(खजिनदार)
९०३५५८६११० **श्री व्याघ्रेश्वर कुलस्वामी परिवार** ९९७००००९१४
द्वारा : श्री धनंजय श्री रानडे, कार्यवाह
४ रमा माधव, १०५/२, नारायण पेठ, पुणे – ४११०३०.
फोन : (०२०) ९८२२२९५६१० आसूद दूरध्वनी :
**व्रत सेवेचे – भक्तीचे - ज्ञानाचे**
Website : [www.vyaghreshvar.com](http://www.vyaghreshvar.com) रजि नं.:एफ – २२१४ Email : svkp.pune@gmail.com

---

दि. १४ जानेवारी २०२६

**महाशिवरात्री उत्सव निमंत्रण पत्रक ... वर्षे ४५ महाशिवरात्री उत्सव २०२६.**

प्रति,
**मा. सभासद, श्री व्याघ्रेश्वर कुलस्वामी परिवार, पुणे**
सप्रेम नमस्कार,

सर्वप्रथम सर्व **व्याघ्रेश्वर भक्तांना** मकर संक्रांतीनिमित्त खूप खूप शुभेच्छा !! .. उत्सव निमंत्रणपत्रक रुपाने पाठवत असलेल्या या गोड तीळगुळाचा प्रेमाने स्वीकार व्हावा हि विनंती ! ... तिळगुळ घ्या गोड बोला .. आनंदी व निरोगी रहा !!! .. जय व्याघ्रेश्वर !!

यंदाच्या वर्षीचा महाशिवरात्री उत्सव सोहोळा "माघ कृष्ण १४ शके १९४७", रविवार दिनांक १५ फेब्रुवारी २०२६ आणि पारणं व महाप्रसाद सोमवार दि. १६ फेब्रुवारी २०२६, या दिवशी **श्री देव व्याघ्रेश्वर मंदीर**, आसूद, ता. दापोली, जि. रत्नागिरी येथे आपल्या परिवारातर्फे साजरा होणार आहे.

इ.स. २०१६ चे महाशिवरात्री उत्सवात रु. ४००/ प्रति व्यक्ती इतके उत्सव शुल्क आपण आकारले होते तर गेली दोन वर्षे हेच शुल्क रु. ६०० / प्रति व्यक्ती इतके होते. अर्थात आपण देत असलेल्या सुविधा व त्याचे प्रमाण पाहता उत्सवास मदत करणारे सहृदय दाते असल्यानेच आपण इतके कमी उत्सव शुल्क आकारू शकत होतो. **गेल्या १० वर्षातील वाढलेली महागाई तसेच हाती घेतलेल्या पुनरुत्थान कार्यास देखील आता Fund raising ची अत्यंत आवश्यक्यता आहे. त्यामुळे यावर्षी उत्सव देणगी शुल्क** म्हणून **रु. ८००/ प्रति व्यक्ती** आकारली आहे. (सहा वर्षांखालील मुलांसाठी उत्सव शुल्क नाही) भक्तांचे वाहन घेऊन येणाऱ्या बसेस, कार इ. वाहनांचे चालकांसाठी उत्सव देणगी पासेस काउंटरवरून रू. ८०० / प्रती चालक भरून घ्यावेत. **प्रत्येक गाडी मालकाने आपापल्या गाडीच्या चालकाला एक विनंती वजा सूचना नक्की द्यावी कि आवश्यकता भासेल तेंव्हा उपस्थित वयस्कर भक्तांना भक्तनिवास ते मंदिर व मंदिर ते भक्तनिवास नेण्या - आणण्याची मदत करावी.**

हे **उत्सव देणगी शुल्क हे संपूर्ण महाशिवरात्री उत्सवासाठी एकत्रित व प्रतिव्यक्ति शुल्क आहे तसेच ते भरून त्याचे कुपन घेणे, हे अनिवार्य आहे.** उपस्थित भक्तांची, भक्तनिवास येथील **एकत्रित निवास** तसेच दि. १४ फेब्रुवारी रोजीचे रात्रीचे भोजन, दि. १५ फेब्रुवारी रोजी सकाळी नाश्ता, महाशिवरात्रीचा दोन्ही वेळचा फराळ, चहा-कॉफी इ. तसेच दि. १६ फेब्रुवारी रोजीचा सकाळची चहा-कॉफी व महाप्रसादाचे भोजन अशी एकूण व्यवस्था सदर देणगी शुल्कात समावेश केलेली आहे.

उपस्थित राहू इच्छिणाऱ्या सर्वांनीच पत्रकात दिलेल्या न्यासाच्या Central Bank of India, Deccan Gymkhana, Pune याच खात्यात / अथवा **upi id 11133810@cbin** / अथवा पत्रकातील QR code स्कॅन करून Gpay, Bheem, Phone pay इ. द्वारे **दि. ०७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत आगाऊ उत्सव देणगी मूल्य भरणे अवश्यक आहे.** उपस्थित राहणाऱ्यां सभासदांनी कृपया आधी (१० फेब्रुवारी पर्यंत) कळवावे ही नम्र विनंती .. त्यानुसार आम्हाला व्यवस्था ठेवायला सोपे होईल.
**(गेली तीन वर्षांच्या पत्रकात नमूद केलेली सुचना कायम आहे व संबंधित व्यक्ती समजूतदार आहे, ती याची दाखल घेऊन नियमांचे पालन करेल अशी खात्री आहे.)**

**महत्वाची सुचना :** **<u>दिनांक ०७/२/२०२६ रोजी रात्री १२ पर्यंत उत्सव देणगी शुल्क भरल्यासच वर नमूद केलेले शुल्क रु. ८०० / प्रती व्यक्ती; आकारले जातील. ०८/२ ते १२/२/२०२६ रात्री १२ पर्यंत उत्सव देणगी शुल्क रु. १०००/ राहील व त्यानंतर रक्कम भरणा करणाऱ्यांसाठी उत्सव शुल्क रु. १३००/ प्रती व्यक्ती राहील याची नोंद घ्यावी ही विनंती</u>.** आपण उत्सव देणगी शुल्क रक्कम भरल्याची व आपल्या उपस्थितीची माहिती रक्कम भरल्यावर त्वरीत त्याची पावती किंवा स्क्रिनशॉट व्हाट्सएप / एस एम एस किंवा दूरध्वनीवर परिवार न्यासाचे कार्यवाह श्री. धनंजय रानडे यांना ९८२२२९५६१० या क्रमांकावर अथवा सहकार्यवाह श्री. श्रीनिवास रानडे यांना ९८२२९६२४५४ या क्रमांकावर कळवावी ही विनंती. ज्यांनी आगाऊ उत्सव देणगी शुल्क भरले असेल त्यांचीच व्यवस्था भक्तनिवासात करता येईल. जे न कळवता येतील त्यांची सोय उपलब्धतेनुसार करण्यात येईल .. संयोजक समिती तसेच न्यासाला उपस्थित भक्तांना चांगली सोय करता यावी व त्यायोगे कार्य उत्तम रीतीने संपन्न करता यावे यासाठीच हि योजना ठेवली आहे. त्यास सर्व सभासद व भक्त, प्रतिसाद देऊन सहकार्य करतील याची खात्री आहे. ... असो ..

महाशिवरात्री उत्सव कालावधीत येणाऱ्या भक्तांच्या निवासाची सोय आपल्या आसूद येथील **"शिवालय" मध्ये <u>फक्त ७५ वर्षांवरील जेष्ठ महिला व पुरुष / विकलांग भक्त</u>** तसेच शिवालय उभारणीसाठी गुंतवणूक करणारे ह्यांनी स्वत: उपस्थिती लावली असल्यास त्यांची .. **शेअर पद्धतीने** निवासाची सोय आधी कळविले असेल त्यानुसार व उपलब्धतेनुसार केली जाईल , मूळ निवासस्थान व खास उभारण्यात येणाऱ्या मंडपात एकत्रित सहनिवास पद्धतीने बाकी सर्व उपस्थितांची सोय केली जाते. **भक्तांनी महाशिवरात्री दरम्यान रात्री पडणारी थंडी लक्षात घेउन स्वत:बरोबर पुरेसे अंथरुण व पांघरुण येताना आणावे.** प्रत्येकाने आपली औषधे बॅटरी इ. बरोबर आणावी .... **<u>वय वर्षे ७५ पूर्ण केलेले जेष्ठ नागरिक / दिव्यांग सदस्य यांच्या व्यतिरिक्त कोणालाही कुठल्याही कारणासाठी शिवालयात निवास करता येणार नाही याची नोंद घ्यावी व त्याबाबत कोणतेही वादविवाद उत्सवाच्या वेळी करू नयेत हि नम्र विनंती ...</u> जय व्याघ्रेश्वर !!!**

**महत्वाचे : इ.स. २०२६ पासून पोस्ट द्वारे सभासदांना पाठवली जाणारी उत्सव निमंत्रण इ. पत्रके फक्त e-mail / social media द्वारे पाठवली जातील .. सबब न्यासाच्या सभासदांनी आपली अद्ययावत e-mail address न्यासाच्या 9423461328 या नंबर वर किंवा <u>न्यासाच्या</u> अधिकृत ई-मेल वर ३१/१२/२०२५ पर्यंत कळविणे आवश्यक आहे.**

**<u>आता उत्सव कार्यक्रमा विषयी ..</u>**

**यंदाही नेहमी प्रमाणे श्री व्याघ्रेश्वर मंदिरात "लघुरुद्रासह सहस्त्रधारा" अभिषेकाचे शेवटचे आवर्तनास सुरुवात झाली की, "नवसाला" हमखास पावणारा "श्रीं" चा जयघोषातला पालखी सोहोळा संपन्न होईल.**
"श्रीं" च्या चांदीच्या मुखवट्याची विश्वस्त मंडळ व भक्त मंडळी यांचेकडून पुजा संपन्न झाल्यावर परिवाराचे अध्यक्ष, कार्यकर्ते आणि भक्तांच्या मदतीने, "श्रीं"ची पालखी नामघोषात भक्तनिवासातून मंदिरात मिरवत आणतील मंदिर परिसरातील तीन प्रदक्षिणा झाल्यावर कमानी जवळ आपल्या परिवारातील पाच सुवासिनी पालखीला ओवाळतील त्या नंतर लघुरुद्राचे आणि पालखीचे यजमान कमान ते गर्भगृहापर्यंत पालखी सन्मानाने आणतील .... **जय व्याघ्रेश्वर !!!**

श्री व्याघेश्वर कुलस्वामी परिवार भक्तनिवास प्रांगणात, रविवार दिनांक १५ फेब्रुवारी २०२६ (महाशिवरात्रचे दिवशी) रोजी सायं ४.३० वा न्यासाची मंदिर जीर्णोद्धार, सुविधा इ. बाबत विचारांचे आदान-प्रदान करणारी एक सभा घेण्यात येणार आहे. सर्व उपस्थित न्यास सभासदांनी सभेस उपस्थित राहून मौलिक सूचनांची देवाण घेवाण करून न्यासाच्या चर्चेत सहभागी व्हावे ही विनंती .. जय व्याघ्रेश्वर !!!

**त्यानंतर सायंकाळी ६.१५ ते रात्री ९.३० चे दरम्यान, परिवाराचा खास सांगीतिक व मनोरंजनाचा बहारदार कार्यक्रम होईल. सौ. दिपलक्ष्मी रानडे (संपर्क ९९२२७३१९३५) व सौ. चित्रा जोशी (संपर्क ९११३२४०६४०) या कार्यक्रमाच्या संयोजक आहेत. कुणाला सदर कार्यक्रमात सहभागी व्हायचे असल्यास २५ जानेवारी २०२६ पूर्वी तुमची नावनोंदणी करणे आवश्यक आहे. ऐनवेळी आलेल्या विनंतीचा वेळेच्या उपलब्धतेनुसारच विचार करण्यात येईल हे समजून घ्यावे हि विनंती.**

सांगीतिक मेजवानी नंतर रात्रीचा फराळ झाला की रात्री १० पासून ते श्री महाशिवरात्र अभिषेक पूजेपर्यंत; **अहिल्यानगरच्या स्वातीताई रानडे**, मागील वर्षाप्रमाणेच, वंदे मातरम् च्या १५० व्या वर्षाचे निमित्ताने, उपस्थितांशी

संवाद साधत एक श्रवणीय प्रवचन सादर करणार आहोत. उपस्थितांनी प्रवचन व **ज्या कार्यक्रमासाठी आपण तिथे आपण आपण सर्व भक्त आवर्जून एकत्र येतो तो मुख्य विधी म्हणजे महाशिवरात्रीच्या शुभमुहूर्तावर 'श्रीं'चे पिंडीवर केला जाणारा महाभिषेक पूजा सोहळा याची देही याची डोळा बघण्याचा लाभ जरूर घ्यावा. निद्रा नित्याचीच आहे परंतु हा सोहोळा वर्षातून एकदाच होतो ... जय व्याघ्रेश्वर !!!**

<u>**महाशिवरात्र उत्सव कार्यक्रम**</u>

**रविवार दिनांक १५ फेब्रुवारी २०२६**

लघुरुद्रासह सहस्त्रधाराभिषेक व पालखी सोहळा .. सकाळी ८.३० ते दुपारी १२.३०

सकाळचा (नाष्टा) फराळ आस्वाद .... सकाळी ८:३० ते १०:३० (सकाळी १०.३० नंतर नाश्त्याचे counter बंद करण्यात येईल)

दुपारचा फराळाचा आस्वाद .... दुपारी १२:४५ ते ३:३०

परिवार न्यासाची विचार आदान-प्रदान सभा ... दुपारी ४.३० ते ५.३०

परिवाराचा सांगीतिक व मनोरंजनाचा कार्यक्रम .. सायंकाळी ६.१५ ते रात्री ९.१५

रंगतदार प्रवचन व श्री महाशिवरात्र महापूजा व आरती ... रात्री ९.३० ते उत्तररात्री १.०० पर्यंत

**सोमवार १६ फेब्रुवारी २०२६**

श्री सत्यनारायणाची महापूजा व आरती ..... सकाळी ८.०० ते १०:००

श्रीं चा महाप्रसाद .... सकाळी १०.३० नंतर

**विविध शहरातुन प्रवासाच्या व्यवस्थेसाठी संबंधित प्रतिनिर्धीशी संपर्क साधावा**

पुणे श्री. जितेंद्र रानडे: - ९०११० ३२१५२

नवी मुंबई / पनवेल - श्री. मंदार रानडे : - ९७६९४ ४९७५८

नाशिक- श्री. श्रीनिवास रानडे :- ९८२२९ ६२४५४ / ९४०४२ १३१३१

गोवा - श्री. अनिल जोशी:- ९४२३३०८६२६

नागपूर - - श्री देवेंद्र रानडे:- ९४२२१ ०५७३२

कर्नाटक - श्री. प्रदिप रानडे: - ९४४८१ ३३७५७

<u>**उत्सवकार्यात आपण या प्रकारे देखील मदत करू शकता**</u>

#अ) पुढे दिलेल्या अंदाज पत्रकातील एखाद्या गोष्टीचा संपूर्ण / अंशत: खर्च स्वीकारून.
#ब) वस्तुरूप देणगी देउन. ( द्यायच्या वस्तु संदर्भात आगाऊ कळवावे ही विनंती )
#क) उत्सवकालात ज्या कामात मदत करण्याची इच्छा असेल; अशा कुठल्याही कामात व्यक्तीश: मदत करून.
#ड) मौजे आसुद येथे आपल्या परिवाराचे साधी व अद्ययावत अश्या दोनही प्रकारची सुविधा असणारे भक्तनिवास व 'शिवालय' या वास्तू आहेत, तेथे माफक दरात भोजन, चहा-नाष्टा व निवासाची वर्षभर उत्तम सोय केली आहे. तरी सर्व भक्तांना विनंती की त्यांनी व त्यांचे परिचितांनी फक्त आपल्या वास्तुतच उतरावे.
#इ) आपल्या ओळखीतील अशा व्यक्ती, की ज्यांचा कुलस्वामी श्री. व्याघ्रेश्वर आहे, अशा मंडळींना (माहेरवाशिणींसह) आपल्या परिवाराचे सभासद होण्यास प्रोत्साहित करावे. तसेच सभासद असलेल्या वडिलांनी आपल्या मुलांनाही (विशेषत: कमवत्या मुलांना / मुलींना) सभासद करून घ्यावे अशी आमची नम्र विनंती आहे.

**कार्यक्रमाचे अंदाजपत्रक :**

#१) मांडव खर्च (मुख्यतः) प्रायोजक कै. गो. का. रानडे यांचे कुटुंबिय
#२) वाडीच्या चक्क्याचे श्रीखंड: श्री. चं. ना. रानडे यांचे देणगीचे व्याजातून
#३) साजुक तुप शिरीष गजाननराव जोशी, बेळगाव
#४) नारळ, फणस इ. गोवेकर जोशी बांधव.
#५) राजगिरा वडी / लाडू श्री. आनंद (नंदू) रानडे, पुणे
#६) महाप्रसादातील गोड पदार्थ श्री. सत्चिदानंद (सचिन) रानडे, पुणे

#७) महाप्रसादानंतर आईसक्रीम: श्री.धनंजय रानडे, पुणे
#८) महाशिवरात्रीसाठी लागणारी फुले इ... श्री. अभय अरविंद रानडे व सौ. पूर्वा उदय रानडे , पुणे
#९) उत्सवासाठी लागणारे लोणचे इ. ..... श्री. मंदार रानडे, पनवेल (यावर्षीपासून सेवा सुरुवात )

**आवाहन मदतीचे :- पुढे नमूद केल्यापैकी एखाद्या गोष्टीसाठी पूर्णत: / अंशत: देणगी देऊन न्यासाला येणाऱ्या उत्सव खर्चात हातभार लावू शकता ...**

**तपशीलवार खर्चाचा अंदाज**

| Particulars | Qty | Amount Rs. |
|---|---|---|
| किराणा सामान | Misc. | 28,000.00 |
| तांदुळ / वरी तांदुळ | 50Kg | 5,000.00 |
| तेल | 50Kg | 5,000.00 |
| साखर | 110Kg | 5,000.00 |
| साबुदाणा | 50Kg | 4,000.00 |
| भाजी | Misc. | 6,000.00 |
| बटाटे | 100Kg | 3,000.00 |
| बदाम पिस्ता काप | | 2,000.00 |
| कणिक व बेसन | 40Kg+5Kg | 4,000.00 |
| दाणे | | 6,000.00 |
| पालखी वाजंत्री | | 4,000.00 |
| उत्सवातील चहा / कॉफी / नाष्टा इ. | | 35,000.00 |
| दुध | 200Lts | 17,000.00 |
| देणगी वगळता न्यासाला येणारा मांडव खर्च | | 40,000.00 |
| स्पीकर व रोषणाई खर्च | | 35,000.00 |
| उत्सव एकूण मजुरी खर्च | | 65,000.00 |
| बल्लवाचार्य | | 50,000.00 |
| लघुरुद्र, सत्यनारायण इ. गुरुजीं दक्षिणा | | 20,000.00 |
| पाणी व्यवस्था | | 15,000.00 |
| वाहतूक खर्च | | 7,000.00 |
| Gas Cylinder /s | | 4,000.00 |
| विविध गुणदर्शन / कीर्तन इ. | | 20,000.00 |
| Misc. Expenses | | 20,000.00 |
| **TOTAL (Rs.)** | | **4,00,000.00** |

**देणगी थेट जमा करण्यासाठी न्यासाचे बँक खात्यांची तसेच UPI id व QR Code बाबत माहिती**
1. **SHRI VYAGHRESHVAR KULASWAMI PARIVAR**
**(स्पेलिंग मध्ये किंवा मराठीत लिहिताना कुलस्वामी ऐवजी कुलस्वामिनी लिहले गेले नाही ह्याची खात्री करूनच व्यवहार करावा ही सूचना)**
SB/Ac No. 1014330094, Central Bank of India, Deccan Gymkhana Branch, Pune. IFSC CODE: CBIN0280655
२. **UPI id : 11133810@cbin**

३. QR Code

SHRI VYAGHRESHVAR KULA

11133810@cbin

**ऋणनिर्देश :** गत: वर्षी संपन्न झालेल्या श्री महाशिवरात्री उत्सव, श्री महारुद्र उत्सव तसेच त्रिपुरी उत्सवासाठी आर्थिक / जिन्नस अथवा वस्तुरूपी तसेच प्रत्यक्ष मदत केलेल्या सर्व भक्तांचा न्यास कायमच ऋणी राहील .. जय व्याघ्रेश्वर !!!.

**विशेष आभार : इ.स. २०२५-२६ या वर्षात उत्सव, जीर्णोद्धार, शैक्षणिक व इतर उपक्रमांसाठी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देऊन न्यासाला मदत करणाऱ्या सर्व सहृदय देणगीदारांचे न्यासातर्फे शतश: आभार ... जय व्याघ्रेश्वर !!!**

दर वर्षी, श्रींचे आशिर्वाद तसेच भक्तजनांच्या सढळ व सहृदय दानशील वृत्तीने हे कार्य यशस्वीरित्या संपन्न होत असते. त्याचप्रमाणे यंदाच्या वर्षीही आपला सकारात्मक प्रतिसाद मिळेल तसेच आपला उत्स्फूर्त सहभाग याही वर्षी तुम्ही नोंदवाल असा आपण सगळेच मिळून प्रयत्न करू ...

बहुत काय लिहीणे, आपणा सर्वांचा लोभ तर आहेच; तो वृद्धींगत व्हावा हीच श्री देव व्याघ्रेश्वराचे चरणी प्रार्थना !! ....

**जय व्याघ्रेश्वर !!!**

**उत्सव कुपन जपून ठेवणे गरजेचे आहे तसेच ते हस्तांतरणीय नाही हे लक्षात घ्यावे. कुपन असल्याशिवाय भोजन कक्षात प्रवेश दिला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.**

**अध्यक्ष**
श्री शिरीष जोशी
**श्री. व्याघ्रेश्वर कुलस्वामी परिवार**

**सचिव**
श्री. धनंजय रानडे
**श्री. व्याघ्रेश्वर कुलस्वामी परिवार**

श्री. शिरिष ग. जोशी(अध्यक्ष) || श्री व्याघ्रेश्वर प्रसन्न || श्री आनंद सु. रानडे(खजिनदार)
९०३५५८६११० **श्री व्याघ्रेश्वर कुलस्वामी परिवार** ९९७००००९१४
द्वारा : श्री धनंजय श्री रानडे, कार्यवाह
४ रमा माधव, १०५/२, नारायण पेठ, पुणे – ४११०३०.
फोन : (०२०) ९८२२२९५६१० / ९४२३१३८३६५ आसूद दूरध्वनी :
**व्रत सेवेचे – भक्तीचे - ज्ञानाचे**
Website : www.vyaghreshvar.com रजि नं.:एफ – २२१४ Email : svkp.pune@gmail.com

**॥ श्री व्याघ्रेश्वर प्रसन्न ॥**

## श्री व्याघ्रेश्वर मंदिर पुनरुत्थान कार्य मदतीचे आवाहन

प्रति,
मा. सभासद / हितचिंतक,
श्री व्याघ्रेश्वर कुलस्वामी परिवार.

### एक दैवी साद: सहस्त्रवर्षांच्या परंपरेचे रक्षण आणि श्री व्याघ्रेश्वर मंदिराचा भव्य जीर्णोद्धार

### "देवालयाचा जीर्णोद्धार ही केवळ वास्तूची दुरुस्ती नसते, तर ती आपल्या पूर्वजांनी जोपासलेल्या संस्कृतीच्या कृतज्ञतेची पावती असते."

कोकणच्या निसर्गसंपन्न दापोली भूमीतील आसूद गावी, गेल्या **१००० वर्षांपासून** अध्यात्माचा सुगंध दरवळत ठेवणारे **'श्री व्याघ्रेश्वर'** हे केवळ एक मंदिर नाही, तर ते कोकणच्या अस्मितेचे आणि हजारो कुटुंबांच्या कुळाचाराचे अधिष्ठान आहे. त्रैकुटक किंवा त्यानंतरचे, ११ व्या शतकातील शिलाहारकालीन स्थापत्यशास्त्र आणि पेशवेकालीन लाकडी कोरीवकामाचा अजोड संगम असलेल्या या मंदिराला आता काळाच्या ओघात आपल्या भक्कम आधाराची गरज आहे.

शेकडो पावसाळे आणि काळाचे आघात सोसून आज या मंदिराचा डोलारा काहीसा खिळखिळा झाला आहे. लाकडी कोरीवकामावर झालेली काळाची पुटं, पाषाणांना गेलेले तडे आणि लाकडी कौलारू छताची झालेली पडझड; आपल्याला साद घालत आहे. आपल्या पूर्वजांनी दिलेला हा दैवी वारसा पुढच्या पिढीला सुरक्षित आणि वैभवशाली स्वरूपात सोपवणे, हे आपले परम कर्तव्य आहे.

### मंदिराचे अद्वितीय महत्त्व: एक ऐतिहासिक आणि आध्यात्मिक ठेवा

- **स्वयंभू शिविलंग:** मंदिराच्या गर्भगृहात विराजमान असलेले श्री देव व्याघ्रेश्वर या दिव्य नामाने ख्यात असलेले 'स्वयंभू' शिवलिंग हे चैतन्याचा अखंड स्रोत आहे.
- **हेमांडपंती स्थापत्य:** पाषाणांवर केलेले बारीक कोरीवकाम आणि महाकाय नंदीची मूर्ती हे आपल्या पूर्वजांच्या प्रगत कौशल्याचे प्रतीक आहे.

- **काष्ठशिल्प (Woodwork):** मंदिराच्या अंतरमंडपातील लाकडी कोरीव काम हे महाराष्ट्रातील उत्कृष्ठ शिल्पकलेचा नमुना आहे.
- **ऐतिहासिक संदर्भ:** येथील प्राचीन 'वीरगळ' आणि 'गोमुख' १२ व्या शतकातील इतिहासाची साक्ष देतात.

### जीर्णोद्धाराची तातडीची गरज का?

कोकणचा रौद्र पाऊस आणि वाढत्या आर्द्रतेमुळे मंदिराच्या दगडी भिंतींना आणि दुर्मिळ लाकडी खांबांना झीज लागली आहे. गाभारा सुरक्षित ठेवण्यासाठी आणि मंदिराचे प्राचीन सौंदर्य अबाधित राखण्यासाठी **'श्री व्याघ्रेश्वर देवस्थान ट्रस्ट'** आणि **'श्री व्याघ्रेश्वर कुलस्वामी परिवार'** यांनी शास्त्रोक्त पद्धतीने श्री देव व्याघ्रेश्वर मंदिर पुनरुत्थानाचा संकल्प सोडला आहे.

### या महायज्ञात आपले योगदान काय असू शकते?

हा जीर्णोद्धार म्हणजे केवळ दगड-विटांचे काम नाही, तर तो आपल्या भक्तीचा 'महोत्सव' आहे. या कार्यासाठी आम्ही आपणास खालील प्रकारे सहभागी होण्याचे आवाहन करतो:

१. **शिलान्यास सेवा:** मंदिराच्या पायाभरणीपासून ते कळसापर्यंतच्या कामात आपल्या शक्तीनुसार आर्थिक मदत करणे.
२. **स्मृती दान:** आपल्या पूर्वजांच्या स्मृतीप्रीत्यर्थ किंवा कुटुंबातील शुभप्रसंगी (वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस) मंदिराच्या विशिष्ट भागासाठी (उदा. खांब, फरशी किंवा छत) प्रायोजकत्व स्वीकारणे.
३. **मंदिर पुनरुत्थान कार्यास लागणारे समान इ.** बाबत माहिती घेऊन त्याचा थेट पुरवठा करणे (यासाठी बांधकाम साहित्य, लाकूड इ. चे पुरवठा करणार्यांना दाट थेट रक्कम देऊ शकतो.)
४. **प्रसार सेवा:** हे आवाहन आपल्या मित्रपरिवारापर्यंत पोहोचवून लोकसहभाग वाढवणे.

### देणगीसाठी संपर्क आणि बँक तपशील:

आपल्या दातृत्वाचा प्रत्येक थेंब या मंदिराच्या पुनरुज्जीवनासाठी महत्त्वाचा आहे. देणगी दिल्यावर कृपया आपली माहिती (नाव, पत्ता आणि पॅन कार्ड नंबर) पाठवावी जेणेकरून आपणास अधिकृत पावती प्रदान करता येईल.

- **अधिकृत संकेतस्थळ** www.vyaghreshvar.com
- **संपर्क:** ९८२२२ ९५६१० / ९८२२९ ६२४५४ / ९०३५५८६११०
- **बँक तपशील:**

1. **SHRI VYAGHRESHVAR KULASWAMI PARIVAR**
**(स्पेलिंग मध्ये किंवा मराठीत लिहिताना कुलस्वामी ऐवजी कुलस्वामिनी लिहले गेले नाही ह्याची खात्री करूनच व्यवहार करावा ही सूचना)**
SB/Ac No. 1014330094, Central Bank of India, Deccan Gymkhana Branch, Pune. IFSC CODE: CBIN0280655
२. **UPI id : 11133810@cbin**

३. QR Code

SHRI VYAGHRESHVAR KULA

11133810@cbin

**"आपल्या हातून घडलेली ही सेवा, येणाऱ्या अनेक पिढ्यांना धर्माचा आणि संस्कृतीचा मार्ग दाखवेल."**

चला तर मग, श्री व्याघ्रेश्वराच्या चरणी नतमस्तक होऊन, या पवित्र कार्यात खारीचा वाटा उचलून आपल्या संस्कृतीचे रक्षण करूया ... **जय व्याघ्रेश्वर !!!**

**अध्यक्ष**
श्री शिरीष जोशी
**श्री. व्याघ्रेश्वर कुलस्वामी परिवार**

**सचिव**
श्री धनंजय रानडे
**श्री. व्याघ्रेश्वर कुलस्वामी परिवार**

**अध्यक्ष**
श्री. मत्स्येन्द्रनाथ रानडे
**श्री. देव व्याघ्रेश्वर विश्वस्त न्यास**

**सचिव**
श्री विजय जनार्दन जोशी
**श्री. देव व्याघ्रेश्वर विश्वस्त न्यास**